Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at lbp.world

संत तुकारामांकडून ढोंगी साधुंचा पर्दाफाश

प्रा.डॉ. विश्वनाथ पवार
एस.जी.एम. कॉलेज, कराड.

प्रास्ताविक :

संत तुकारामांचे मातापिता विठ्ठलभक्त असून आषाढी, कार्तिकीची वारी करत होते. हीच विठ्ठलभक्ती तुकारामांच्यात उतरली. संसार तापाने पोळलेले तुकोबा सारा वेळ ईश्वराचे चिंतन करण्यात व भजन कीर्तनात घालवू लागले. देहूजवळच्या भंडारा व भामनाथ डोंगरावर परमेश्वर चिंतनात एकांताचे सुख अनुभवू लागले. परमेश्वर चिंतनात रंगल्याचा त्यांना आत्मप्रत्यय आला. संत तुकाराम महाराजांचे अभंग वाङ्:मय उत्स्फूर्त व आत्माविष्काराच्या स्वरूपाचे आहे. त्यांनी साडेचार हजार अभंग रचना केल्या आहेत त्यांनी लोभी आणि ढोंगी साधूंचा पर्दाफास केला आहे.

तुकाराम महाराजांचे शब्द सामर्थ्य : संत तुकाराम शब्दांना देव मानून शब्दांची पूजा बांधतात. ते म्हणतात,

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं ।।
शब्दाची आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्दे वाटूं धन जनलोका ।। [1]

संत तुकाराम हे समाजशास्त्रज्ञ होते. त्यांनी शाश्वत नीतिमुल्यांचा पाठपुरावा केला तुकोबांच्या अभंगातून निर्भयता आणि शौर्य व्यक्त होते. संत तुकाराम हे निर्भीड टीकाकार आहेत.

डॉ. सदानंद मोरे म्हणतात, 'तुकोबांनी पाहिलेले जनकल्याणाचे स्वप्न त्यांच्याच हयातीत त्यांनी पूर्णत्वास नेले. निःशस्त्र योध्दयाने शब्दांच्या बळावर कर्मठ समाजाला, फॅसिस्ट समाजाला ताळयावर आणले. हजारो वर्षापासून सुरू असलेले धर्मयुध्द जिंकले. नवी सर्वसमावेशक धर्मव्यवस्था आणि समाजव्यवस्था अस्तित्वात आणली. कोणतेही शस्त्र हातात न घेता आपल्या वाणीच्या बळावर, अहिंसात्मक पध्दतीने समाजकंटकांचा निःपात करून एक मोठे धर्मयुध्द जिंकल्याचा इतिहास पहिल्यांदा निर्माण केला तो केवळ तुकोबांनी,[2]

ढोंगी साधुंचा पर्दाफाश : संत तुकारामांनी आपल्या अनेक अभंगातून लोभी व ढोंगी साधूंचा समाचार घेतला आहे. आशाबध्द वक्ता व्यक्त करताना ते म्हणतात,

आशाबध्द वक्ता,
भय श्रोतियाच्या चित्ता.
गातो ते चि नाहीं ठावे,
तोंड वासी कांही द्यावे,
जालें लोभाचें मांजर,
भीक मागे दारोदार,
माप आणि गोणी,
तुका म्हणे रितीं दोन्ही.[2]

द्रव्याची लालसा धरून कीर्तन करणारा वक्ता असला की, 'हा काही तरी मागलेच' अशा प्रकारची भीती ऐकणाऱ्याच्या मनात निर्माण होते. यामुळे तो काय गातो आहे. याचा ठाव श्रोत्याला लागत नाही. लोकांनी काही द्यावे यासाठीच तोंड वासणे असते. असा वक्ता म्हणजे घरोघरी भिक मागणारे मांजरच होय. असा लोभी वक्ता व मनात त्याची भिती धरणारे श्रोतेजन असल्यानंतर कसले कीर्तन व कसले श्रवण? रिकाम्या मापामुळे गोणी काही केल्या भरू शकत नाही. परिणामतः दोन्ही रिकामीच अशी अवस्था होते.

'भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा' या अभंगामध्ये ढोंगी साधूंचा ढोंगीपणा उघड करण्याचा प्रयत्न संत तुकारामांनी केला आहे. ते म्हणतात,

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा
तेथें अनुभवाचा काय पंथ.
वाढवुनी जटा फिर दाही दिशा,
तरी जंबुवेषा सहज स्थिती.
कोरोनियां भूमी करिती मधीं वास,
तरी उंदरास काय वाणी.
तुका म्हणे एसें कासया करावें,
देहासी दंडावे वाउगें चि.[3]

काही ढोंगी साधू भगवी वस्त्रे परिधान करतात. त्यांना देवाच्या अनुभवाचा ठावठिकाणा नसतो. जर वेषच पाहवायाचा झाला तर कुत्र्याचा नैसर्गिक वेषही भगवाच असतो. केवळ जटा वाढवून दाही दिशांना भटकणे हे भक्ताचे लक्षण नाही. कोल्हा तर अशा वेशात नेहमीच असतो. जमिनीत विवर करून जर साधू झाले असते तर उंदराच्या साधूत्वाचे वर्णन कसे करावे. संत तुकाराम महाराज म्हणतात, बाहय गोष्टीवरून साधुत्व ठरत नसल्याने शरीराला त्रास देण्यास अर्थ नाही.

संत तुकारामांच्या कालखंडात दांभिक साधूंचा सुळसुळाट होता. तो आजही आहे. अशा ढोंगी साधूंवर टीका करताना संत तुकाराम महाराज म्हणतात,

साधक झाले कळी
गुडगुडीची लांब नळी
पंचीं पड मद्यपान
भांगभुर्का हे साधन

अभेदाचें पाठांतर
अतिविषयीं पडिभर
चेल्यांचा सुकाळ
पिंड दंड भंगपाळ
सेवा मानधन
बरें इच्छेने संपन्न
सोंगाच्या नरकाडी
तुका बोडोनिया सोडी.

तुकोबां म्हणतात, या काळा गुडगुडीची लांब नळी तोंडात धरून मोक्ष साधू पाहाणारे अनेक साधक आहेत. मद्यपान हा त्यांचा नित्याचा भाग आहे. भांग, तंभाखू ही त्यांच्या मोक्षाची साधने आहेत. परमेश्वराच्या अद्वैता बाबतची वचने त्यांना मुखोद्गत आहेत. मात्र ते विषयांत रममान झालेले आहेत. अशा ढोंगी साधुंच्या ठिकाणी चेल्याचाटयांचा नी आडदांडांचा सुकाळ दिसून येतो. त्यांची शिष्यांकडून सेवा, मान, धन मिळावे ही ईच्छा असते. अशा ढोंगी साधूंची डोकी तुकाराम महाराजांनी बोडून काढली.

धंदेवाईक कीर्तनकारांनी कीर्तनाला व्यावसायिक रूप दिले. कीर्तनाच्या माध्यमातून अर्थप्राप्तीचा उद्देश ठेवला. आपणाकडे अनुभव नसताना समाजाला ज्ञान सांगण्याचा प्रयत्न करून लोभाची अपेक्षा ठेवली हे सांगताना संत तुकाराम म्हणतात,

मुखे सांगे ब्रम्हज्ञान।
जन लोकांची कापितो मान ।।
ज्ञान सांगतो जनासी।
नाही अनुभव आपणासी ।।
कथा करितो देवाची।
अंतरी आशा बहु लोभाची ।।
तुका म्हणे तो चि वेडा ।
त्याचे हाणूनि थोबाड फोडा ।।[4]

संत तुकारामांनी व्यावसायिक कीर्तनकारांचे बिंग फोडले. तुकोबांच्या निर्भीड व परखड जहाल वाणीमुळे बाजारू कीर्तनकारांनी तुकोबांची धास्ती घेतली होती.

संत तुकारामांचा कीर्तनाचा कोणताही फड नव्हता. तुकोबांच्या काळातही गळयात माळा घालून, कपाळावर बुक्का लावून, आपण संत आहोत असा बाहयाचार करून काही कीर्तनकार द्रव्य घेऊन कीर्तन करीत होते. आजतर अनेक किर्तनकारांनी किर्तनाला व्यावसायाचे स्वरूप दिलेले आहे. कीर्तनासाठी द्रव्य घेणारे जसे गुन्हेगार त्याचप्रमाणे द्रव्य देणारेही गुन्हेगार आहेत हे सांगताना संत तुकाराम म्हणतात,

जेथे कीर्तन करावे ।
तेथे अन्न न सेवावे ।।
बुका लावू नये भाळा ।
माळ घालू नये गळा ।।
तुका म्हणे द्रव्य घेती ।

देती तेही नरका जाती ।।

संत तुकाराम आपला मृदू स्वभाव तसेच कठोर स्वभाव विशद करताना म्हणतात की,

मऊ मेणाहूनि आम्ही विष्णूदास।
कठिण वज्रास भेदूं ऐसे ।।
मेले जित असों निजोनियां जागे ।
जो जो जें जें मागे तें तें देऊं ।।
भले तरी देऊं कासेची लंगोटी ।
नाठया(ठा)ळाचे काठी देऊं माथां ।।[5]

या अभंगात संत तुकाराम म्हणतात, आम्ही विष्णूदास मेणाहून मऊ आहोत त्याचप्रमाणे इंद्राच्या हातातील कठीण वज्र भेदण्यास समर्थ आहोत. आम्ही देहबुध्दीने मरून आत्मस्थितीने जिवंत आहोत. आमच्या जवळ जो जे मागेल ते त्यास आम्ही देऊ. जे सत्प्रवृत्त आहेत त्यांना प्रसंगी कासेची लंगोटी देऊ. तर जे अपप्रवृत्त (नाठाळ) आहेत त्यांच्या मस्तकी काठी हाणू.

सनातन्यांचा व भोदूंचा विरोध : संत तुकारामांचे प्रासादिक कवित्व पाहून काही उच्चवर्णीय सनातनी व भोंदू मंडळींना त्यांचा हेवा वाटू लागला. यामध्ये मंबाजीबुवा व रामेश्वरभट्ट प्रमुख होत. वेदाधिकाराला वंचित झालेली एक शुद्र व्यक्ती, 'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । इतरांनी वहावा भार व्यर्थ ।।' अशा आत्मविश्वासाने बोलत आहे हे पाहून सनातन्यांची डोकी भडकली. तर समाजाच्या सर्व थरांतील लोकांनी संत तुकारामांचे अभंग वेदतुल्य मानले. त्यांची अभंग गाथा मराठी रयतेच्या घरा घरात पोहचली.[7]

सारांश : संत तुकारामांनी आपल्या अभंगाच्या व कीर्तनाच्या माध्यमातून लोभी, स्वार्थी व ढोंगी साधूंवर निर्भीड टीका केली. त्यांचे खरे रूप समाजासमोर आणले. कीर्तनाच्या माध्यमातून उदरनिर्वाह करणाऱ्यांचा, ज्ञानाचा व्यापार करण्याऱ्यांचा पर्दाफाश केला.

संदर्भ सूची :

1) डॉ. सानप किशोर, समग्र तुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, मे 2008, पृ 645.
2) कित्ता, पृ. 25
3) डॉ. पिंगे श्री.म.व प्रिं.माळी गजमल, (संपा) तुकारामांचे निवडक अभंग, व्हीनस प्रकाशन, पुणे, जुलै 1962.पृ. 71
4) कित्ता, पृ. 67
5) डॉ. सानप किशोर, उपरोक्त, पृ. 269
6) डॉ. बेणारे गोपाळराव, सार्थ श्रीतुकारामांची गाथा, मे.सरस्वती ग्रंथ भांडार पुणे, पृ. 142
7) ढेरे रा.चि, विविधा, नीलकंठ प्रकाशन, पुणे, पृ. 83